दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे
बीड/महाराष्ट्र · सोमवार दि.११ नोव्हेंबर २०२४ · आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ · वर्ष २ रे · अंक -८० · पाने ४ · किंमत ४ रुपये

## मविआचा जाहीरनामा म्हणजे अफवा,ते विकास करणार नाहीत

**नागपूर (वृत्तसंस्था)**-काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज महविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात महाविकास आघाडीकडून पाच हमी देण्यात आल्या आहेत. मात्र, मविआचा जाहीरनामा अफवा असल्याची टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही, असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. ते नागपूर येथे माध्यमांशी बोलत होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसचा व महाविकास आघाडीचा जाहीरनामा हा अफवा आहे. कारण काँग्रेस विकास करणार नाही, त्यामुळे त्यांच्या जाहीरनाम्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. काँग्रेस लाडकी बहीण योजनेसाठी ३ हजार रुपये देणार असल्याचे म्हणत आहे. पण काँग्रेसवाले खोटारडे आहेत. ही योजना बंद करण्यासाठी ते कोर्टात गेलेत. आम्हाला असल्या योजना परवडणार नाहीत, असे विजय वडेट्टीवारांसह अनेक नेते बोलले आहेत आणि आता तेच योजना परत आणत आहेत, असा हल्लाबोल बावनकुळे यांनी केला. तर आमचे बजेट तयार असून रस्ते, वीज, पाण्यासाठी आम्ही केंद्राकडून पैसे आणू, असे ते म्हणाले.

# महायुतीच्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतील:केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे स्पष्ट संकेत

## राजकीय वर्तुळात मुख्यमंत्री पदाबाबत चांगलीच चर्चा सुरू



सांगली (वृत्तसंस्था)-केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्रातील प्रचार सभेत आगामी काळात महायुतीच्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतील असे संकेत दिले. सांगली जिल्ह्यातील शिराळा येथे भाषण करताना अमित शहा यांनी देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेत तेच मुख्यमंत्री असतील असे संकेत दिले आहेत. महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीस यांनाच आणायचे, अशी महाराष्ट्रातील जनतेची इच्छा असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात मुख्यमंत्री पदाबाबत चांगलीच चर्चा सुरू झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या नंतर महायुतीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण? याबाबत चांगलीच खलबते सुरू आहेत. राज्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान असले आणि २३ रोजी निकाल लागणार असला तरी मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण असेल? याबाबत सुरुवातीपासूनच चर्चा रंगली आहे. त्यात महायुतीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या तीनही नेत्यांच्या नावावर चर्चा सुरू आहे. तर महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे, नाना पटोले, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांच्या नावाची चर्चा आहे. मात्र या वादात आता अमित शहा यांनी थेट देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचे संकेत दिल्याने याबाबत राजकीय चर्चा रंगली आहे.

### एकत्र बसून निर्णय घेणार-अजित पवार

**मुख्यमंत्री पदाबाबत आम्ही शहा यांच्या वक्तव्यानंतर**



**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही महायुती म्हणून याबाबत एकत्र बसून निर्णय घेणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. महायुतीचाच मुख्यमंत्री होईल, असा दावा देखील अजित पवार यांनी केला आहे. मात्र, अमित शहा यांनी जे संकेत दिले आहेत याबाबत विचारले असता, तो त्यांचा अधिकार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. राज्यात तीन पक्ष एकत्र निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यामुळे युतीमध्ये दोन पावले मागे यावे लागतात तर कोणाला दोन पावले पुढे जावे लागत असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.**

### अमोल कोल्हेंकडून अजित पवारांच्या जाहीरनाम्याची खिल्ली

# प्रिंटिंग मिस्टेकमुळे चंद्र आणून देण्याचे आश्वासन द्यायचे राहिले

**मुंबई (वृत्तसंस्था)**-अजित पवार यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यामध्ये राज्यातील जनतेला विविध योजनांचे आश्वास देण्यात आले आहे. मात्र, शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी अजित पवारांच्या जाहीरनाम्याची खिल्ली उडवली आहे. आता फक्त चंद्र आणून देतो, एवढेच आश्वासन जाहीरनाम्यात द्यायचे राहिले आहे. प्रिंट मिस्टेकमुळे अजित दादांकडून तेवढा वादा राहिल्याची मिष्किली टिप्पणी अमोल कोल्हे यांनी केली.



अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ५० मतदारसंघासाठी ५० स्वतंत्र जाहीरनामे जाहीर केले आहेत. त्यामध्ये शेतकरी कर्जमाफीच्या आश्वासनासह लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवणार असल्याचे सांगितले आहे. दरम्यान, राज्यावर साडे आठ लाख कोटींचे कर्ज असतानाही जाहीरनाम्यातून इतके सारे करण्याचे आश्वासन दिले जाते आहे, असे म्हणत अमोल कोल्हेंनी अजित पवारांच्या जाहीरनाम्यावर अनेक प्रश्न उपस्थित केले. जाहीरनाम्यात कदाचित प्रिंटिंग मिस्टेक झाली आहे. त्यात आम्ही तुम्हाला चंद्र आणून देऊ ही एक ओळ छापायची राहून गेली. महाराष्ट्र राज्यावर तब्बल साडे आठ लाख कोटींचे कर्ज असताना अडीच वर्षात असंविधानिक आणि पक्ष फोडून सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. हे त्यांनी कशासाठी केले?, असा प्रश्न निर्माण होतो.पक्ष फोडून, चिन्ह पळवून, पक्षाच नाव घेऊन जे काही मिळालं. त्यांनी साध्य काय केलं. लोकसभेत मतदान कमी पडल्याने लाडकी बहीण योजना काढली. दोन- अडीच महिन्यात अनेक योजनांचा निधी ठराविक योजनेकडे वळवला. इतर सर्व योजना वाऱ्यावर सोडल्या, अशी टीका अमोल कोल्हे यांनी केली.अमोल कोल्हे यांनी महागाईवरूनही सरकावर निशाणा साधला. भाव स्थिर ठेवण्याचे आश्वासन या सरकारने दिले. पण, गेल्या दोन वर्षात दहा जीवनावश्यक वस्तूंचे भाव या सरकारने स्थिर ठेवले आहेत का? याचे उत्तर सरकारने द्यावे. दिवाळीचा किराणा भरताना खिशाला किती खार लागला, हे प्रत्येकाला कळलेले आहे आणि त्यामुळे महायुतीचे आश्वासन हे केवळ पोकळ हवा आहे. आता सत्तेत येणार नाही हे माहित आहे असल्यामुळे वाटेल ती आश्वासने जाहीरनाम्यातून दिली जात आहे, असा अमोल कोल्हेंनी महायुती सरकाला लगावला आहे.

# असे गलीच्छ लिखाण करणाऱ्यांना देशात राहायचा अधिकार नाही

## तळपायाची आग मस्तकात जाते-उदयनराजे

**सातारा (वृत्तसंस्था)**-खासदार उदयनराजे भोसले यांनी पत्रकार परिषद घेत काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. राहुल गांधी यांचा एक लेख वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाला आहे. या लेखावर उदयनराजे भोसले यांनी आक्षेप घेत तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. तसेच राहुल गांधीला या देशात राहण्याचा अधिकार नाही, असेही ते यावेळी म्हणाले आहेत.

उदयनराजे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्याची स्थापना करून थांबले नाहीत. तर लोकांचा सहभाग हा राज्याच्या कारभारात असला पाहिजे हा विचार छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याकाळी मांडला. लोकशाहीचा पाया जर कोणी भरला असेल तर ते शिवाजी महाराज आहेत. मात्र हा राहुल गांधी हा स्वतःला कोण समजत आहे हे काही कळत नाही. पण मला वाटले होते काँग्रेसचा काहीतरी तो ज्येष्ठ असेल, पण एकंदरीत सोशल मीडिया जर बघितले तर तळपायाची



आग मस्तकात गेल्याशिवाय राहत नाही. राहुल गांधी यांचा एक लेख वर्तमानपत्रात छापून आला आहे. त्यावर उदयनराजे भोसले यांनी आक्षेप घेतला आहे. ते म्हणाले, हा राहुल गांधी कुठे जन्माला आला मला कळत नाही. जे युग पुरुष आहेत त्यांच्याबद्दल बोलताना आपण जरा आदरपूर्वक बोलले पाहिजे. त्या लोकांचे योगदान फार मोठे आहे त्यामुळे आपण मोकळा श्वास घेऊ शकत आहोत. ते राहिले लांब आणि त्यात मात्र हा करतोय अपमान. याला किती इतिहासाबद्दल माहीत आहे किंवा शिवाजी महाराजांबद्दल माहीत आहे.छत्रपती शियावजी महाराजांनी विचार दिला आहे. परकीय आक्रमण त्यांनी परतवून लावले आहेत. तरी हा राहुल गांधी असा बोलतो. याने हा लेख लिहिताना आफू घेतला असेल. असे गलीच्छ लिखाण कोणी करत असेल तर अशा कुठल्याही व्यक्तीला या देशात राहायचा अधिकार नाही. प्रत्येक वेळेस काहीतरी कॉन्ट्रोवर्सी निर्माण करायची. देशातील लोकांनी अशा लोकांना पुढे येऊ दिले नाही पाहिजे, असे देखील आवाहन उदयनराजे भोसले यांनी यावेळी केले आहे.

# धनगर समाजाला विविध पदावर प्रतिनिधित्व देणाऱ्याला की, निवडणूकीतील स्वत:ची निशाणी विसरणाराला तुम्ही मत देणार?-धस

## येळकोट येळकोट जय मल्हार म्हणत धनगर समाजाचा सुरेश धस यांना पाठींबा

**आष्टी । प्रतिनिधी**

धनगर समाज हा अत्यंत प्रामाणिक आणि कष्टकरी समाज असून माझ्या राजकीय जीवनातील सुरुवातीपासूनच मी अनेक व्यक्तींना अनेक पदांवर पदाधिकारी म्हणून काम करण्याची संधी दिली आहे हे सर्व नावे मी सांगतो विरोधी उमेदवारांनी अशा प्रकारचे नावे सांगावीत असे आव्हान माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी दिले. धनगर समाज बांधवांच्या बैठकीमध्ये ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर भाजपा ओबीसी राष्ट्रीय उपाध्यक्ष मा.खा. चंदुलालजी साहु साहेब,प्रदेश सचिव नवनाथ पडळकर,देविदास धस,उपाध्यक्ष किसान मोर्चा नवनाथ शिंदे,राजाभाऊ गावडे,भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस मा.अभिजित शेंडगे, अशोक ढवण,ह.भ.प. सुरेश महाराज कोळेकर,ह.भ.प. नारायण भोंडवे, जिल्हाप्रमुख भिमराव माळशिखरे,रामहरी महारनोर,यशवंत सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोनसळे,दादा हरिदास, हनुमंत काळे, मुकेश काळे, रामदास शेंडगे,नारायण भोंडवे,रामकिसन भोंडवे,सुरेश काळे,भाऊसाहेब राऊत आदी उपस्थित होते. धस




पुढे बोलताना म्हणाले,माझ्या विरोधात जे तीन उमेदवार आहेत.त्यांना माझे एकच म्हणणे आहे की,तुम्ही पण असा मेळावा घ्या तुम्ही सगळेच तिथे जा मी ज्याप्रमाणे समाजातील व्यक्तिंना विविध ठिकाणी पदाधिकारी पदावर बसवले ती नावे सांगतो त्याप्रमाणे तुम्ही देखील नावे सांगावीत.या मेळाव्यातील उपस्थित सगळ्यांना नावासहित ओळखू शकतो.त्यांनी मंडपातील दहा टक्के उपस्थितांची जर त्यांनी नावे सांगितली तरी त्यांना मतदान देऊन टाका मला मान्य राहील...असे सांगत माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी विरोधी उमेदवाराला आव्हान देऊन म्हणाले की,अरे तुम्ही काय गप्पा मारता ? निवडणूक आयोगाने दिलेली तुमची निशाणी ते वाजवायच्या ऐवजी दुसऱ्याची निशाणी फुका म्हणता...मी माझ्या आजवरच्या राजकीय कारकीर्दीमध्ये धनगर समाजाला अनेक पदावर बसवून न्याय देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे करणाऱ्याला का निवडणूक आयोगाने दिलेले स्वतःच जे चिन्ह विसरणारला तुम्ही मदत करणार का? असा सवाल करून पुढे बोलताना ते म्हणाले की कधीही कोणाचीच जात पात पाहून मी कधीच काम केलंल नाही असा मी कार्यकर्ता आहे.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमधून केलेल्या सुरनारवाडी ,भोजेवाडी, बुर्हेवाडी,सुलेमान देवळा,दादेगाव, शेंडगेवाडी मी आमदार असताना अनेक रस्ते कामे केली आहेत. अनेक अडचणीच्या काळात मी मतदाराला आलेला आहे त्यामुळे येणाऱ्या २० तारखेला मला तुम्ही साथ समर्थन द्या पुढील पाच वर्षे काम करण्याची संधी द्या.

यावेळी अध्यक्षीय समोरोप करताना राष्ट्रीय उपाध्यक्ष साहू म्हणाले, जो राष्ट्र हिताच्या व्यापक विचार करणारे आणि मोदीजींच्या विकासावर विश्वास ठेवीन असा या मतदारसंघासाठी उमेदवार म्हणून लोकप्रतिनिधी मधून म्हणून सुरेश धस यांना आपण विजयी करावे असे यावेळी बोलताना त्यांनी आवाहन केले.तर शृंगार ऋषी गडाचे महंत सुरेश महाराज कोळेकर म्हणाले की, मी सुरेश धस यांना आशीर्वाद देऊन विजयाची खात्री चा संकल्प या मेळाव्यानिमित्त करतो आपण सर्वांनी सुरेश धस साथ द्यावी. भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अभिजित शेडगे यावेळी बोलताना म्हणाले,धनगर समाजाचे प्रतिनिधी म्हणून सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तींना जिल्हा परिषद अध्यक्ष असो, जिल्हा परिषद सदस्य असो सरपंच, सेवा सोसायटी चेअरमन ,अशा अनेक पदावर काम करण्याची संधी सुरेश धस यांनी अनेक धनगर समाजाला दिली असून त्यांना सहकार्य करा. यावेळी सकल धनगर समाजाच्या मेळाव्यास आष्टी,पाटोदा, शिरूर तालुक्यातील पदाधिकारी ,सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता

संपादकीय

# तुझे आहे तुजपाशी...



आनंद प्रत्येकाच्या मनात सहज प्रवृत्तीप्रमाणे असतो. कोणाला अगदी क्षुल्लक गोष्टीतही खूप आनंद मिळतो, तर कित्येक जणांना मोठा आनंदही दाखवता येत नाही. सुख मानणे व आनंद घेणं-देणं हे माणसाची नैसर्गिक वृत्ती असते. मात्र हे खरं की, आनंद मनाला रिचार्ज करणारे विनामूल्य टॉनिक आहे. आजकाल धकाधकीच्या जीवनात आनंदाचे क्षण समोर दिसले तरी उपभोगाची मानसिकताच नाही. आपण जाणीवपूर्वक आनंदाचे येणारे क्षण साजरे करायचे आणि मनाचा, शरीराचा उत्साह वाढवायचा. जीवनातील ताण कधी चुकत नाहीत, आणि चुकणारही नाहीत. कारण सुख-दुःख, आनंद -शोक हे जुळे भाऊ आहेत. सुखाचा आनंद मनात जपायचा. दुःखाचा मार बाऊ न करता सोसायचा. आपला जीवनप्रवास आनंदमय करण्यासाठी हे करणं गरजेचं आहे. सकाळी उठून नुसतं निसर्गाकडे पाहिलं की कळतं की, कालचं सुकलेलं फुल जाऊन उद्या उमलणारी कळी वाऱ्यावर डोलत असते. रंगीबेरंगी फुलपाखरे नाचत असतात, सप्तरंगांची निसर्गाची उधळण चालू असते. कशातही खंड पडत नसतो. सकाळी देवालयातून येणारा भजनाचा आवाज, देवापुढे लावलेल्या सुवासिक उदबत्तीचा सुगंध, घरात आरतीच्या वेळेला होणारा घंटानाद आणि नातवंडांची गडबड, मुलांची गडबड मनाला प्रसन्न करून टाकते. डोळे उघडे ठेवून जगावे. आपले भारतीय सण, त्याकरिता केली जाणारी तयारी, सणावारांचा जेवणावळींचा कार्यक्रम मन उत्साही करतो, मनाला चैतन्य देतो. रोजच्या रुटीनमधील बदलही आनंददायी असतो. सामुदायिक कामात, नामस्मरणात, मदत करण्यात, दान सत्पात्री देण्यातला आनंद घ्यावा.कोणालाही बदलण्यापेक्षा जमले तर जुळवून घ्यावे, नाहीतर आपला मार्ग आखावा. मन सतत गुंतले की बारीक सारीक गोष्टींत मोठा आनंद मिळतो. आपण नेहमी चांगल्या विचाराने दुसऱ्याकडे बघितलं की मनातली जळमटं साफ होतात व आनंदाची नवनवीन दिशा सापडते. आनंद घ्यावा, आनंद द्यावा. जगा, जगू द्या या तत्त्वावर आयुष्य रेखावे. आयुष्य सोपं नसतं आणि नव्हतं. अवघड असलं तरी ते कठीणही नसते.

आयुष्य हे नेहमी चढ-उतारांचे असते, खाचखळग्यांचं असतं. मनाचं आरोग्य चांगलं राखलं की तनाचं आरोग्य चांगलं बनतं. असं म्हणतात, मन चंगा तो कठौतीमें गंगा... 'आनंदाचे डोही आनंद तरंग'. खडतर जीवन प्रवास करायचा तर आहेच, पण आनंद या शब्दाशी आपण शरीर व मनाने कायम जवळीक ठेवायची आणि मनाला तशी शिकवण द्यायची. संसारात कित्येक क्षण सुखाचे असतात, पण आपल्या स्वमग्नतेत आणि या आभासी जगात आपण नकळत इतके गुरुफटले गेलोत की हे आनंद क्षण उपभोगायचे आपण विसरूनच गेलो. मैत्रीचे क्षण, बालपणाचे क्षण, शाळा, कॉलेजचे क्षण परत परत आठवावेत, जुन्या लोकांना भेटावं, आठवणी उजळाव्यात आणि मनातला आनंद द्विगुणीत करावा. रोज एका मळलेल्या वाटेने न जाता निरनिराळ्या वाटा चोखाळा, मग पहा आयुष्यातला तोचतोचपणा, एकसुरीपणा हरवून नावीन्य कसं आनंद आणतं. हे जे नावीन्य आहे, तोच जीवनानंद आहे. निसर्गात जीवनानंद आजूबाजूलाही आहे. गुलाबाच्या रंगात आहे, निसर्गाच्या हिरवाईत आहे, नातवंडांच्या साखर स्पर्शात, देवाच्या सान्निध्यातही तो आहे. चाफ्याच्या मोहक वासात आहे, जोडीदाराच्या सहवासात आहे, फार काय मनासारख्या खरेदीतही जीवनानंद आहे. आपण मनाने आणि शरीराने तो उपभोगायचा हे महत्त्वाचं आहे. सारासार विचार दुःखाची संकटांची तीव्रता कमी करतात व सकारात्मकता वाढीला लागते. आपल्याला वयाच्या कोणत्याही टप्प्यावर एकटेपणा नको असतो. जबाबदाऱ्या नीट पार पाडायच्या. वय झालं की सारं आनंदाने पुढच्या पिढीकडे सोपवायचे. मनापासून अलिप्त होताना हा निग्रह करावा लागतो.

# आपला रानटी व राक्षसी देश

आई-वडिलांना सोडून प्राथमिक शाळेच्या वसतिगृहात राहणाऱ्या दुसरीतल्या-नऊ वर्षांच्या मुलग्याचा शाळेच्या संचालकांनी आणि इतरांनी शाळेच्या भरभराटीसाठी 'बळी' द्यावा; ही उत्तर प्रदेशातील घटना अंगावर काटा आणणारी आहे. शाळा जोरात चालावी आणि आपली कर्जे फिटावीत, यासाठी आपल्याच शाळेतील लहानग्याचा गळा आवळून जीव घ्यावा; असे शाळाचालकांना वाटूच कसे शकते? उत्तर प्रदेशातील हाथरस जिल्ह्यात ही खासगी शाळा चालविणाऱ्या संचालकाचा बाप व इतरांना या मुलाला बळी म्हणून जिवंतच गाडायचे होते. त्यासाठी त्याला झोपेतच वसतिगृहातून उचलण्यात आले. मात्र, तो जागा झाला आणि रडू लागला. तेव्हा या संचालक व इतरांनी त्याचा नाक व गळा दाबून खून करून टाकला आणि आई-वडिलांना कळविले की तुमच्या मुलाला ताप आला आहे. हा गुन्हा घडल्यानंतर तो उजेडात येण्यास आणि कारवाई होण्यास जो वेळ लागला; तो पाहता हे प्रकरण दडपण्याचा निश्चितच प्रयत्न झालेला दिसतो. या मुलाचे शव घेऊन दवाखान्यांमध्ये जाणाऱ्या शाळाचालकांच्या गाडीवर एका राजकीय पक्षाचा झेंडा होता, असे साक्षीदार सांगत आहेत. हे खरे असेल तर उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची 'गुन्हेगारांना धडा शिकविण्याची आणि तात्काळ न्याय देण्याची' भाषा पोकळ व बाष्कळ म्हणायला हवी. आत्ता पाच जणांना अटक झाली असली तरी असा हा 'काळ्या जादू'चा पहिलाच प्रकार नसणार. या शाळेच्या आवारातील विहिरीत जारण-मारण किंवा चेटूक करण्यासाठी लागणारी सामग्री सापडली आहे. तसेच, या मारेकऱ्यांच्या तावडीतून सुटून घरी पळून गेलेला एक छोटा शाळकरी मुलगा 'अंकल ने मेरा गला दबाया था...' असे कॅमेऱ्यासमोर सांगतोच आहे.



या मृत मुलावर ठार करण्यापूर्वी अत्याचार झाले आहेत का, हे तपासात स्पष्ट होईल. पण एकीकडे महत्त्वाकांक्षी शैक्षणिक धोरणे लागू होणाऱ्या आपल्या देशात काय लायकीचे लोक शाळा आणि शैक्षणिक संस्था चालवत आहेत, हे यातून स्पष्ट होते. महाराष्ट्रातील शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, आश्रमशाळा, वसतिगृहे यांचीही स्थिती फारशी बरी नाहीच. अर्थात, आपल्यापुढे उत्तर प्रदेशाचाच आदर्श असल्याने त्यात आश्चर्य नाही. गेल्याच वर्षी नाशिक जिल्ह्यात आश्रम-शाळकरी मुलांचा अपमृत्यू झाला होता. अर्थातच, हाथरसमधील हत्येला अंधश्रद्धेच्या विळख्याची जी काळी बाजू आहे, ती भयानक आहे आणि या क्रौर्याची तुलना कशाशीही करणे शक्य नाही. 'आता कुठे काय अंधश्रद्धा..?' असे म्हणण्याची शहरांमध्ये साधारण फॅशन आहे आणि त्यामागे अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची अवहेलना करण्याचा सूर असतो. ते त्यांचे काम करीतच आहेत. मात्र, धर्माचा, धर्माच्या आचरणाचा आणि धार्मिक समजुती तसेच धर्मश्रद्धांचा प्रवाह स्वच्छ झाल्याशिवाय हे मध्ययुगाला लाजवतील असे गुन्हे थांबणार नाहीत. याची प्रामुख्याने जबाबदारी 'आम्ही हिंदू धर्माचे किंवा धर्मासाठी काम करतो..' असे सांगणाऱ्या सर्व पक्ष, संस्था, संघटना, पंथ, उपपंथ, धर्माचार्य, कीर्तनकार, प्रवचनकार, संत-महंत, बाबा-बुवांची आहे. 'असे वर्तन हा खरा धर्म नाही..' असे या सर्वांनी वारंवार उच्चरवात, सर्वतोपरी सांगितल्याशिवाय असे प्रकार कमी होणार नाहीत. सर्वच धर्मांमधील अशा प्रकारांच्या विरोधात खरे तर राष्ट्रव्यापी मोहीमच उघडायला हवी. तेच खरे धर्मकार्य असेल. मात्र, राजकीय नेतेच नव्या घरात जाताना किंवा जुनी घरे सोडताना अंधश्रद्धा पसरविणारे काळे-कभिन्न विधी करत असतील तर काय बोलणार?उत्तर प्रदेश सरकारला या ओबीसी वर्गातील, वडील अपंग असणाऱ्या निष्पाप मुलाच्या खुनाची तड लावायची असेल तर तातडीने विशेष न्यायालय स्थापावे. पाचही आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. शाळेवर कारवाई करू, असे आता सांगितले जात आहे. मात्र, या शाळा व वसतिगृहाला कायमचे टाळे लावायला हवे. सर्वच राज्य सरकारांनी आपण कुणाला शाळा, आश्रमशाळा, कॉलेजे.. देत आहोत, याचेही जरा आत्मपरीक्षण करावे. हाथरसमधील ही शाळा चालविणाऱ्याचा बाप अशी काळी जादू आधीपासूनच करत आहे. मग या शाळेतील इतरही मुलांवर या आधी असे अघोरी प्रयोग झाले नसतील, कशावरून? त्या दृष्टीने सखोल चौकशी व्हायला हवी. अशा गुन्ह्यांमध्ये 'हा आपल्या पक्षातला व हा विरोधी पक्षातला', असे निकष लागत असतील असल्या पक्षपाती, धृतराष्ट्री सरकारांपेक्षा मोगलाई परवडली. ज्या मुलाचे पालक 'याला आयएएस, आयपीएस बनवू..' अशी स्वप्ने पाहात होते, त्यासाठी त्याला दूर वसतिगृहात ठेवत होते; त्यांच्या हातात शिक्षण क्षेत्रातील या राक्षसांनी अंधश्रद्धेपायी मारून टाकलेल्या मुलाचा निष्प्राण देह ठेवला आहे. काळीज चुरगळून टाकणारी याहून दुसरी मोठी शोकांतिका कोणती असू शकेल? हाही आजचा भारत आहे आणि तो मन पुरते काळवंडून टाकणारा आहे..

# गुंतवणूकदारांना झालंय काय?

मारुतीच्या शेपटीप्रमाणे 'वाढता वाढता वाढे' असा मुंबई शेअर बाजार निर्देशांक आणि निफ्टी फिफ्टी निर्देशांक बघून भारतीय सामान्य गुंतवणूकदार कानात वारं शिरलेल्या बैलासारखे उधळले आहेत की काय, अशी शंका येऊ लागली आहे. आजवर कधीच अशी कृती छोट्या सामान्य गुंतवणूकदारांकडून अनुभवास आली नव्हती. खरोखरच एवढे छोटे सामान्य गुंतवणूकदार काही महिन्यांत आर्थिक साक्षर होऊन शेअर्स व्यवहारात सक्षमपणे आणि स्वतंत्रपणे एवढ्या मोठ्या रकमेचे व्यवहार करू लागलेत की त्यांना वाढणाऱ्या निर्देशांकांची भूल घालून अवास्तव नफ्याची आमिषे दाखवून शेअर बाजारात 'बकरे' बनवले गेले आहेत? हे आणि असे अनेक प्रश्न फेर धरून उभे आहेत. गेल्या दहा वर्षांतील लोकांचा विविध गुंतवणूक माध्यमांत बचत करण्याकडील कल लक्षात घेता खूपच मोठा बदल झाल्याचे आढळते. मागील चार आर्थिक वर्षांत सर्वसामान्य लोकांनी बँक ठेवी मोडून शेअर्स आणि म्युच्युअल फंड्सकडे मोठ्या प्रमाणात आपली बचत वळवली. बँकामधील पुनरावर्ती खाती-रिकरिंग डिपॉझिट बंद करून म्युच्युअल फंडांच्या नियोजनबद्ध गुंतवणूक योजनांना -एसआयपींना आपलेसे केले. परिणामी बँकांच्या ठेवी आणि कर्जांमधील तफावत वाढत गेली. त्यामुळे आता बँकांना रोखे विक्रीतून निधी उभरावा लागत आहे. विद्यमान आर्थिक वर्षांत किमान एक कोटी वीस हजार रुपयांचा निधी या रोखे विक्रीतून उभा केला जाणार आहे. विक्रीस येणाऱ्या रोख्यांपैकी सुमारे ८५ टक्के हिस्सा सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा असणार आहे.

ब्ल्यूमबर्ग आणि एसओआयसीच्या सर्वेक्षणांनुसार २०१४मध्ये सर्वसामान्य लोकांची सर्वाधिक बचत बँक ठेवींत असायची. हे प्रमाण एकूण बचतीच्या ३३ टक्के होते, तर बचत खात्यांत २१ टक्के आणि चालू खात्यात ४ टक्के असायची. आयुर्विमा, पेन्शन योजना आणि म्युच्युअल फंडांत अनुक्रमे २३ टक्के, ७ टक्के, आणि ५ टक्के असून शेअर्समध्ये ७ टक्के गुंतवलेले होते, परंतु आता २०२४मध्ये ही सर्व परिमाणे बदलली आहेत. एकूण बचतीच्या २३ टक्के बँक ठेवीत, १७ टक्के बचत खात्यांत आणि चालू खात्यात अवघे २ टक्के आहेत. आयुर्विमा, पेन्शन योजना आणि म्युच्युअल फंडांत अनुक्रमे २१ टक्के, १२ टक्के, आणि ११ टक्के असून शेअर्स मध्ये १२ टक्के गुंतवलेले आहेत. रोखेसंग्रह व्यवस्थापन सेवेत (झचड) आणि पर्यायी गुंतवणूक फंडांत (-खत्र) दोन टक्के आहेत. विविध गुंतवणूक



माध्यमांत गुंतवणूक करताना वैविध्यपूर्ण -ऊळ- ींशीीळषळशव असली पाहिजे, हे जरी खरे असले तरीही अधिकाधिक जोखीमयुक्त साधनांकडे गुंतवणूकदारांचा झुकलेला कल वेगळेच चित्र पुढ्यात आणतो. हे चित्र निश्चितच भयावह असून त्यांना आर्थिक विवंचनेकडे नेणारे आहे. कोविड काळात घरी बसून काम करताना पगाराबरोबरच किंवा नोकरकपातीचा बळी म्हणून रोजच्या रोज अतिरिक्त उत्पन्न मिळवता येईल, या भ्रमात किंवा आशेने शेअर बाजारात आश्वासक टाकलेले पाऊल नंतरच्या दोन वर्षांत कसे घसरत गेले ते कळलेच नाही. वॉरेन बफे यांची तत्त्वे एका दृष्टिक्षेपात शिकून नियमित वेतनाव्यतिरिक्त चार पैसे (की रुपये ?) अधिक मिळविण्यासाठी शेअर बाजारात काहीही करण्यापर्यंत गेलेली मजल डोळे विस्फारणारी आहे. वायदे बाजारातील (निष्पणक डेरिव्हेटिव्ज) म्हणजेच फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये गेल्या दोन आर्थिक वर्षांत सामान्य छोट्या गुंतवणूकदारांनी केलेले व्यवहार बघून सेबीलाही या व्यवहारांची दखल घ्यावी लागली. आर्थिक वर्ष २०२१-२०२२मध्ये फ्युचर्स आणि ऑप्शन्स मध्ये व्यवहार करणाऱ्या किरकोळ गुंतवणूकदारांची संख्या ५१ लाख होती, ती २०२३-२०२४ मध्ये ९६ लाखांवर पोहोचली होती. आर्थिक वर्ष २०२१-२२च्या अहवालात सेबीने स्पष्ट केले आहे की, फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये गुंतवणूक केलेल्यांपैकी ८९ टक्के गुंतवणूकदारांना तोटा झाला होता. २०२१ ते २०२४ या तीन आर्थिक वर्षांच्या फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये सुमारे एक कोटी दहा लाख गुंतवणूकदारांपैकी ९३ टक्के गुंतवणूकदारांना सरासरी प्रत्येकी किमान दोन लाख रुपयांचा तोटा स्वीकारावा लागला आहे. सर्व गुंतवणूकदारांना झालेल्या तोट्याची एकूण रक्कम एक लाख ८० हजार कोटी रुपयांची आहे. मागील तीन आर्थिक वर्षांत फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये केवळ एक टक्काच गुंतवणूकदारांना एक लाख रुपयांहून अधिक रकमेचा नफा झाला आहे. हे सर्व व्यवहार बघताना एक बाब प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये वैयक्तिक गुंतवणूकदारांनी देशी संस्थात्मक गुंतवणूकदार आणि परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार यांच्या तुलनेत सपाटून मार खाल्ला आहे. देशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी ३३ हजार कोटी रुपयांचा तर परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी २८ हजार कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. याच आर्थिक वर्षात वैयक्तिक गुंतवणूकदारांनी ६१ हजार कोटी रुपयांचा तोटा स्वीकारावा लागला आहे. याच व्यवहारांमुळे मागील तीन आर्थिक वर्षांत वैयक्तिक गुंतवणूकदारांकडून ५० हजार कोटी रुपये व्यवहार शुल्क प्राप्त झाले. त्यात दलालांचे कमिशन ५१ टक्के असून २० टक्के बाजारशुल्क होते. एकीकडे फिनएन्फ्लूयुएन्सर दर दिवसाला ऑप्शन्स व्यवहारांतून एक टक्का लाभ मिळवा, असे भासवत असतानाच सेबीच्या अभ्यास अहवालात एक गोष्ट स्पष्ट झाली, ती म्हणजे एकूण गुंतवणूकदारांपैकी फक्त एक टक्काच वैयक्तिक गुंतवणूकदार फक्त एक लाख रुपयांहून अधिक नफा कमावू शकले आहेत. सेबीने अभ्यास केलेल्या मोठ्या पंधरा दलाल पेढ्यांच्या खात्यांमध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये नव्वद टक्के वैयक्तिक गुंतवणूकदार असून त्यापैकी ७५ टक्के लोकांनी राष्ट्रीय शेअर बाजारात फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये व्यवहार केल्याचे उघडकीस आले आहे. ऑप्शन्समध्ये व्यवहार करणाऱ्या छोट्या गुंतवणूकदारांची गेल्या तीन वर्षांतील उलाढाल एक लाख कोटी रुपयांहून अधिक होती आणि त्यांना झालेल्या निव्वळ तोट्याची रक्कम १००३ कोटी रुपये होती. ज्या गुंतवणूकदारांनी प्रत्येकी किमान एक कोटी रुपयांहून अधिक उलाढाल याच कालावधीत केली, त्यांचा एकत्रित तोटा १,४१,६४१ कोटी रुपये होता. वयाच्या पंचविशी-तिशीत असलेल्या युवा पिढीने या फ्युचर्स आणि ऑप्शन्सच्या व्यवहारात अधिक रस घेतल्याचे सिद्ध झाले आहे. आर्थिक वर्ष २३-२४मध्ये या तोट्यात गेलेल्या युवा गुंतवणूकदारांचे प्रमाण ९३ टक्के होते. अशाच व्यवहारात तोटा पदरात पडलेल्या वयाची साठी उलटलेल्या जेष्ठ नागरिकांचे प्रमाण ७९ टक्के होते. ज्या गुंतवणूकदारांचे वार्षिक उत्पन्न पाच लाख रुपयांहून कमी आहे अशा लोकांचे फ्युचर्स आणि ऑप्शन्स व्यवहारात तोटा झालेले प्रमाण ९२.२ टक्के आहे. स्त्री आणि पुरुष अशी गुंतवणूकदारांची वर्गवारी केली तर सरासरी प्रतिस्त्री गुंतवणूकदाराला ७५,९७३ रुपये तर प्रति पुरुष गुंतवणूकदाराला ८८,८०४ रुपये तोटा स्वीकारावा लागल्याचे सिद्ध झाले आहे.या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी स्वत:च्या लोभाला आणि अविवेकी कृतीला आवर घालण्याची वेळ आली आहे. आपल्या कष्टाच्या कमाईचे पैसे असे मातीमोल होणे कोणालाच परवडणारे नाही आणि त्याचे होणारे दूरगामी परिणाम गुंतवणूकदारांच्या कुटुंबव्यवस्थेवर होणार आहेत, याचा तरी गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. अशावेळी नियामक संस्था आणि सरकार यांना दूषणे देण्यापेक्षा स्वत:ला वेळीच सावरणे आवश्यक ठरणार आहे. चटकन श्रीमंत होण्यासाठी आपले भविष्य असे पणाला लावण्यापेक्षा म्युच्युअल फंड्स आणि निवडक शेअर्स खरेदीतून प्रदीर्घ टिकणाऱ्या संपत्ती निर्माणाचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे.

# शैक्षणिक संस्थांचे पळवाटांचे धूर्त धडे

सरकारी नियमांचे जोखड मानेवर बसू नये यासाठी पळवाटा कशा शोधायच्या, याचे धडे शिक्षण संस्था स्वतःच धूर्तपणे गिरवत असतात. गोरगरिबांना कोणतेही दाम न मोजता शिक्षणाचा हक्क मिळावा, यासाठी विनाअनुदानित शाळांमध्येही राखीव जागा ठेवण्याची योजना आली. मात्र, त्यातून सुटका करून घेण्यासाठी शाळांनी आता अल्पसंख्याक दर्जाची ढाल पुढे केली आहे. मुंबईत अर्ध्याहून अधिक शाळांना अल्पसंख्याक दर्जा आहे. शेजारच्या ठाणे जिल्ह्यातही गेल्या चार वर्षात चारशे शाळांनी अल्पसंख्याक दर्जा मिळवून या आरटीई कायद्यातून सुटका करून घेतली आहे. धर्म, भाषा यांच्या आधारे शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा मिळतो. या संस्थांमधील प्रवेश त्याच अल्पसंख्याक श्रेणीतून भरले जातात का, हे कधीच बाहेर येत नाही. अल्पसंख्याक दर्जा म्हणजे आपल्याला हव्या त्या प्रकारे प्रवेश देण्याचे साधन म्हणून कित्येक संस्था वापरतात. महाविद्यालयीन स्तरावरही या दर्जाचा तसाच वापर आजवर होत आला आहे. मुळात सामाजिक न्यायाच्या सद्हेतूने अल्पसंख्याक दर्जा त्या संस्थेला देण्यात आला आहे. मग तोच सद्हेतू लक्षात घेऊन समाजातील वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचे भान या संस्थांनी दाखविणे अपेक्षित होते. त्यांनी ते केलेले नाही व राज्य सरकारनेही त्यांची ही पळवाट सहज स्वीकारून टाकली आहे.मराठी भाषेच्या अनिवार्यतेच्या मुद्द्यावरूनही आजवर या शाळांनी या ढालीचा वापर करून सरकारी सक्तीला वाटाण्याच्या अक्षताच लावल्या. विद्यार्थ्यांची फी असो, गणवेश किंवा काही चालीरीतींची सक्ती याबाबतीतही कॉन्व्हेंट शाळांनी कधीच कुणाला जुमानले नाही. काही वेळा तर सत्ताधीशांनी आम्ही या शाळांचे पाणी तोडू वगैरे पोकळ वल्गनाही केल्या होत्या. रग्गड फी भरून आपल्या पाल्यांना या शाळेत टाकणारे पालक तर हतबलच असतात. लग्नसमारंभांसाठी शाळेचे आवार देऊन या संस्था चांगले उत्पन्न कमावतात. मराठमोळ्या व जुन्याजाणत्या संस्थांना मात्र उत्पन्नाचे असे स्रोत तयार करताना नाकी नऊ येतात व सरकारी वजनकाट्यावर माप तोलत बसावे लागते. मराठीची जपणूक करणाऱ्या शैक्षणिक संस्था टिकाव्यात व नियमांमधून पळवाटा काढणाऱ्या संस्थांचे पितळ उघडे पडावे, यासाठी कोणत्याही सरकारांनी आजवर कधी अंकुश उगारलेला नाही. अर्ध्याअधिक संस्था जर सामाजिक जबाबदारीतून बादच होणार असतील, तर आर्थिक दुर्बलांना शैक्षणिक हक्क प्रदान करण्याचे ईप्सित साध्य तरी कसे होणार ?




# श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताह प्रारंभ

## मन्मथ स्वामींची कार्तिक पौर्णिमेची ४५० वर्षाची अखंडित परंपरा आजही कायम

**बीड । प्रतिनिधी**

श्री मन्मथ स्वामी महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हा हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. संत महादेव बाबा, संत भगवान बाबा, संत वामन भाऊ, संत ज्ञानेश्वर माऊली यासारखे अनेक संत जिल्ह्यात होऊन गेले. अनेक वर्षाचा कालखंडामध्ये त्यांनी कीर्ती केली.

महाराष्ट्रामध्ये दोनच संत असे होऊन गेले की, त्यांनी संजीवन समाधी घेतली. 'संत ज्ञानेश्वर' आणि 'संत मन्मथ स्वामी' मन्मथ स्वामी यांची गेल्या ४५० वर्षा पासून कार्तिक पौर्णिमेला या ठिकाणी मोठी यात्रा भरते. लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून 'श्रीक्षेत्र कपिलधार' महाराष्ट्रात नव्हे तर देशामध्ये ओळखले जाते.श्री क्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताहाचे प्रारंभ दिनांक ९-११-२०२४ रोजी करण्यात आला असून या सप्ताहामध्ये संपूर्ण महाराष्ट्र भरातून गायक, वादक तसेच शिवकिर्तनकाराचे व भाविक भक्तांची उपस्थिती असते यामध्ये भजन, शिवकिर्तन, शिवपाठ, काकडा, भारुड,



श्रीची महापूजा अन्नदान व शेज आरती तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे व महा प्रसादाचे आयोजन करण्यात येते. येणार्या १५ नोव्हेंबर ला त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त विविध राज्यातून पायी दिंडीयांचे आगमन होते . तसेच अनेक राज्यातून शेकडो दिंड्या या ठिकाणी येतात. हा परिसर अत्यंत निसर्गरम्य ठिकाणी आहे. त्यामुळं येणारा प्रत्येक भाविक या ठिकाणी आल्यावर समाधान व्यक्त करतो. आणि सर्व समाज एकत्र करून एक विचार या ठिकाणावरून घेऊन जातात.

या सर्व कार्यक्रमाचा लाभ भाविकभक्तांनी घ्यावा असे आवाहन देवस्थान पंचकमेटी, श्रीक्षेत्र कपिलधार येथील पुजारी विश्वनाथ बापू स्वामी, डॉ. त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार, वैजिनाथ महाराज शिंदे दत्तसंस्थान बालाघाट यांनी केले आहे.

४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म माघ शुद्ध पंचमी १४८२ ला झाला.

जगाला पवित्र करण्याचे सामर्थ्य या वीरशैव कुळामध्ये आहे. त्याच कुळामध्ये ४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावी मन्मथ स्वामी यांच्या आई पार्वती आणि वडील शिवलिंग स्वामी यांच्या पोटी झाला. मन्मथ स्वामी यांचा जन्म दिनोदर बाबा यांच्या आशीर्वादाने झाला होता. त्यांनी शिव सांप्रदायाचा पाया रोवाला तसेच लिंगायत वीरशैव साहित्याचे व समाजाचे ते जनक आहेत. भजन कीर्तन नामस्मरण ही परंपरा त्यांनी चालू केली. तसेच मन्मथ माऊलींनी शिव संप्रदायाचा पाया रचला व क्लस हा शिवसंत लक्ष्मण महाराजांनी रचला. लक्ष्मण महाराजांची समाधी जोड आष्टी येथे आहे. मन्मथ माऊलींनी पहिली ध्वज पताका खांद्यावर घेऊन कपिलधार ते शिखर शिंगणापूर पदयात्रा काढली.

या ठिकाणची आख्यायिका

या ठिकाणी कपिल मुनी यांचं वास्तव्य होतं. कपिल मुनी यांची गंगासागर येथे समाधी आहे. कपिल मुनी हे तपस्वी असल्यामुळे त्यांनी हे क्षेत्र दिनोदर बाबा यांच्या ओटीमध्ये टाकलं म्हणजे त्यांना दान केलं. दिनोदर बाबा हे एक तपस्वी महाराज होते. ते या ठिकाणी असलेल्या पंचकुंडाच्या ठिकाणी गुप्त झाले. त्याअगोदर दिनोदर बाबा यांनी हे तीर्थक्षेत्र मन्मथ स्वामी यांना स्वाधीन केलं होतं. मन्मथ स्वामी यांनी या ठिकाणी तपश्चर्या करून वयाच्या २६ व्या वर्षी संजीवन समाधी घेतली.

संजीवनी समाधी घेणारे महाराष्ट्रातील दुसरे संत मन्मथ स्वामी यांची कर्मभूमी म्हणून ओळखल्या जाणार्या कपिलधार या ठिकाणी गेले. ४५९ वर्षापासूनची ही परंपरा व लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. संजीवनी समाधी घेणारे हे महाराष्ट्रातील दुसरे संत म्हणून ओळखले जातात. मन्मथ स्वामी यांनी 'परम रहस्य' हा ग्रंथ कपिलधार या ठिकाणी लिहिला. त्यावेळी त्याठिकाणी दुसरं प्राणी देखील वास्तव्यास होते. अनेक वाघ, सिंह, साप या ठिकाणी वास्तव्य होते. ज्यावेळी मन्मथ स्वामी त्या ठिकाणी तपश्चर्या करत असत त्यावेळी त्यांच्या अंगा खांद्यावर साप खेळत असत असा त्यांचा अनेक वर्षापासूनचा इतिहास आहे.

---

# मा.आ.संगिता ठोंबरे यांच्या समर्थकांचा अखेर नमिता मुंदडा यांना पाठींबा

**केज । शेख सज्जाद**

माजी आमदार संगिता ठोंबरे यांच्या उमेदवारीसाठी आग्रही असलेल्या व निवडणुकीत माघार घेतल्याने नाराज झालेल्या समर्थकांनी भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या उपस्थितीत रविवारी दि. १० रोजी होळ येथे पार पडलेल्या बैठकीत केज विधानसभा मतदारसंघाच्या भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार आमदार नमिता मुंदडा यांना पाठींबा दिल्याने त्यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला आहे. विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर होताच आमदार नमिता मुंदडा यांच्या विरोधात निवडणूक लढविण्यासाठी अनेकजण इच्छुक होते. त्यामध्ये माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी भाजपाकडून विद्यमान आमदारांना उमेदवारी मिळणार असल्याचे पाहून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार



पक्षाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केला. परंतू राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने निष्ठावंत असलेल्या पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे संगिता ठोंबरे यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. परंतू उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटच्या दिवशी त्यांनी नाट्यमय रित्या उमेदवारी अर्ज मागे घेत पृथ्वीराज साठे यांना पाठींबा दिला. त्यामुळे त्यांची चोवीस तासाच्या आत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाली. हा निर्णय घेताना विश्वासात न घेतल्याने नाराज झालेल्या त्यांच्या समर्थकांनी अखेर रविवारी विजय केंद्रे यांच्या शेतात नंदकिशोर मुंदडा यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या बैठकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नमिता मुंदडा यांना पाठींबा जाहीर केला आहे. यावेळी माजी उपसभापती नेताजी शिंदे, महादेव सुर्यवंशी, सुनील घोळवे, विजय केंद्रे, सुधाकर लांब, माऊली इंगळे, विकास करपे, साहेबराव नवगिरे, अरूण करपे, दिपक भाकरे, दत्ता लाड, रणजित तपसे, कृष्णा करपे,अंकुश शिंदे, कैलास सोनवणे, दत्ता शेप, सचिन तोडकर, बिभीषण शिंदे, शिवरूद्र आकुसकर, धनंजय देशमुख, नितिन बनसोडे, माऊली शिंदे, बबनराव धस, उत्तम धस, संदीप गायकवाड यांच्या बहुतांश संगिता

ठोंबरे यांचे समर्थक कार्यकर्ते उपस्थितहोते.

---

# भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र राज्याच्या संरक्षण सचिव पदी अमरसिंग ढाका यांची निवड



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक १० नोव्हेंबर रोजी मुंबई येथे भारतीय बौद्ध महासभा केंद्रीय कार्यकारिणीची बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन दादर येथे संपन्न झाली. महाराष्ट्र राज्याची भारतीय बौद्ध महासभेची नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली. महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून यु .जी. बोराडे गुरुजी व महाराष्ट्र राज्य भारतीय बौद्ध महासभा संरक्षण उपाध्यक्ष म्हणून असिस्टंट स्टॉप ऑफिसर अशोक कदम यांची निवड करण्यात आली व भारतीय बौद्ध महासभा बीड पश्चिम चे कोषाध्यक्ष अमरसिंग लखमीचंद ढाका यांची महाराष्ट्र राज्य भारतीय बौद्ध महासभेच्या संरक्षण सचिव पदी निवड करण्यात आली. या निवडीचे सर्व बौद्ध बांधवांनी स्वागत व अभिनंदन केले.

---

### महात्मा फुले युवा दलाचा धनंजय मुंडेंना परळी विधानसभेत पाठिंबा

# महात्मा फुले युवा दलाचे प्रमुख ॲड सतीश शिंदे यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेऊन दिले पाठिंब्याचे पत्र

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस सह महायुतीचे परळी विधानसभेचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांना आता विविध क्षेत्रातून पाठिंबा वाढताना दिसून येत असून महात्मा फुले युवा दलाच्या वतीने धनंजय मुंडे यांना आज बिनशर्त पाठिंबा देण्यात आला आहे. महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक व प्रमुख सतीश शिंदे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह धनंजय मुंडे यांची भेट घेऊन पाठिंब्याचे पत्र दिले.



महात्मा फुले युवा दल ही सामाजिक संघटना गेले अनेक वर्ष कार्यरत असून परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यात या संघटनेचे अनेक पदाधिकारी आहेत.

महात्मा फुले युवा दलाने कोणत्याही अटी शर्ती शिवाय धनंजय मुंडे यांना पाठिंबा दिला असून धनंजय मुंडे यांच्या निवडणुकीमध्ये सर्वतोपरी सहकार्य करण्याचा शब्द महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक व प्रमुख सतीश शिंदे यांनी दिला असून, धनंजय मुंडे यांनी या निर्णयाचे स्वागत करत संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

यावेळी महात्मा फुले युवा दलाचे प्रमुख ॲड.सतीश शिंदे यांच्यासह जिल्हाध्यक्ष अजय शिंदे, जिल्हा सरचिटणीस बाबा राऊत, धनंजय शिंदे, महादेव हाके, राजाभाऊ शिंदे, नवनाथ पांचाळ, गणेश माळी, पप्पू गीते, सतीश खंडागळे, जनार्दन खंडागळे, सिद्धार्थ खंडागळे, रामेश्वर क्षीरसागर, अंगद खंडागळे, पप्पू खंडागळे, सचिन खंडागळे, सलमान कुरेशी यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

---


# मायबाप जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही-आ.संदीप क्षीरसागर

## नाळवंडी,ढेकणमोह मध्ये कॉर्नर सभा

**बीड । प्रतिनिधी**

यंदा तुतारी वाजवायची म्हणजे वाजवायची आणि परत एकदा तुम्हाला विधानसभेत प्रतिनिधीत्व करण्यासाठी पाठवायचे अशी, जनभावना ग्रामीण भागातून व्यक्त होत असून मायबाप जनतेच्या या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी आपल्या कॉर्नर सभेदरम्यान म्हटले.

रविवारी (दि.१०) रोजी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारासाठी बीड तालुक्यातील नाळवंडी व ढेकणमोह येथे कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी या भागातील नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या. आ.क्षीरसागर यांना सर्वसामान्यांतून अतिशय



सकारात्मक प्रतिसाद भेटत आहे. भेटीगाठी दरम्यान आ.क्षीरसागर यांनी, येत्या २० नोव्हेंबर रोजी तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करा असे आशिर्वाद उपस्थितांकडे मागितले. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना तालुकाप्रमुख गोरख शिंगण तसेच या भागातील नागरिक, तरूण, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# श्री साई सेवा मंडळ उरण विभागातर्फे उरण ते शिर्डी पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील श्री साईबाबांची मानाची पहिली पालखी म्हणून श्री साई सेवा मंडळाची दिंडी सुपरिचित आहे.सालाबादप्रमाणे या वर्षीही श्री साई सेवा मंडळ उरण विभाग यांच्यावतीने उरण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.यंदाचे पदयात्रेचे हे २४ वे वर्षे आहे.श्री दत्तजयंती उत्सवानिमित्त श्री साईबाबांच्या भव्य पालखी, वारकरी दिंडी पदयात्रा श्री दत्तमंदीर देऊळवाडी-उरण येथून गुरवार , दि.५/१२/२०२४ रोजी सकाळी ६.३० वा. श्रींची आरती करून श्री क्षेत्र शिर्डी येथे प्रस्थान होणार असून श्रींची पालखी शुक्रवार, दि. १३/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. श्री क्षेत्र पुण्यधाम शिर्डी येथे पोहोचेल.गुरवार



दि. ५/१२/२०२४ रोजी सकाळी ६ ते ६:३० वा. श्रींची पालखी व पादुका साईभक्त भाविकांच्या दर्शनासाठी देऊळवाडीतील श्री दत्तमंदीरामध्ये ठेवण्यात येणार आहेत. दरवर्षी पहिल्या दिवशी हनुमान कोळीवाडा येथील साई भक्तांतर्फे सुंदर अशी पालखी सजविली जाते.पालखीचे दर्शन घेण्यासाठी तरी साईभक्त भाविकांनी श्रींच्या पालखीचा व पादुकांच्या दर्शनाचा आवश्य लाभ घ्यावा.तसेच बाबांच्या पालखी दिंडी सोहळ्यामध्ये सामील न होणाऱ्या साईभक्त भाविकांनी पालखी दिंडी सोबत पाच पाऊले चालण्यासाठी व पायी चालत जात असलेल्या पदयात्री साईभक्तांना शुभेच्छा देण्यासाठी हजर राहून श्री साईंचा कृपा आशिर्वाद घ्यावा.असे आवाहन करण्यात आले आहे.पहाटे ५ वा. आरती, पूजन व भजन,५:१५ वा. ॐ श्री साईनाथाय नम: या मंत्राचा जप व पुढे मार्गस्य प्रस्थान, दुपारी १२ वा. मध्यान्ह आरती,दुपारी १२:३० श्री साई सच्चरित्राचे, सामुदायिक साप्ताहिक पारायण तसेच साईस्तवन मंजुरी वाचन, दुपारी ३:३० वा पुढील मुक्कामाकडे प्रस्थान,ॐ श्री साईनाथाय नमः मंत्रांचा जप, सायंकाळी ६.१५ धुपारती असे दैनंदिन कार्यक्रम असून पालखी दिंडीच्या सांगता प्रित्यर्थ श्री साई भंडारा व श्री सत्यनारायणाची महापूजा शनिवार, दि.२१/१२/२०२४ रोजी श्री रत्नेश्वरी मंदीर,मु. जसखार येथे संपन्न होणार आहे.दिंडीत चालत जाणाऱ्या साई भक्तांचे पदयात्री फॉर्म भरण्यासाठी बोकडविरा बस स्टॉप जवळ, किरीट पाटील यांच्या कार्यालयात मंडळाचे तात्पुरते कार्यालय चालू केले आहे. त्याच ठिकाणी पदयात्रीचे फॉर्म भरले जातील याची पदयात्री साई भक्तांनी नोंद घ्यावी असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# स्विप मतदार जनजागृती १९० उरण तर्फे मतदान करण्याचे आवाहन



**उरण । विठ्ठल ममताबादे**

जेष्ठ नागरिक मॉर्निंग कट्टा उरण व एस.टी डेपो उरण या ठिकाणी मतदार जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी केंद्र प्रमुख निर्मला घरत , केंद्र प्रमुख बबन पाटील ,समता ठाकूर,संजय होळकर,संजय पाटील, संगिता गावंड यांनी मतदानाचे महत्त्व पटवून दिले, प्रकाश पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले,संजय होळकर यांनी स्विप तर्फे स्वागत केले तर बबन पाटील यांनी मतदानाचे महत्त्व सांगितले. यावेळी कुलकर्णी सर,श्री.दर्णे, प्रकाश पाटील यांनी आपली मते मांडली,निर्मला घरत यांनी माहिती दिली,तर समता ठाकूर यांनी आभार मानले. यावेळी आनंद बुधे,नितीन पडते, दिनेश घरत, आदि मंडळी उपस्थित होती. यावेळी मी मतदान करणार या बोर्ड वर सह्यां करण्यात आले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बदामराव पंडित यांना भेटण्यासाठी कोणत्याही चमच्याची गरज पडत नाही-कानिफनाथ नागरे

**गेवराई । प्रतिनिधी**

स्वतःच्या कुटुंबाच्या स्वार्थासाठी राजकारणात आलेले अनेक नेते आहेत. कोणाला स्वतःची प्रॉपर्टी वाचवण्यासाठी आमदार व्हायचं आहे, कोणाला आपल्या मुलाला आमदार करायचा आहे तर कोणाला भावाला आमदार करायचं आहे. परंतु गेवराई लोकांनाच बदामराव पंडित यांना आमदार करायचं आहे. कारण लोकांनी लोकांच्याच कामासाठी त्यांना उभा केले आहे. गोरगरिबांसाठीच त्यांची आमदारकी कामाला येते. कारण त्यांच्याकडे काम घेऊन जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला मधल्या चमच्याची गरज पडत नाही असे रोखठोक प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गेवराई संघटक कानिफनाथ नागरे यांनी केले आहे.गेवराई विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लोकप्रिय उमेदवार बदामराव पंडित यांच्या प्रचारासाठी रेवकी, देवकी, गोंदी, हिंगणगाव, कटचिंचोली, अंतरवाली, दैठण, कोल्हेर आदी गावांमध्ये जाऊन घेतलेल्या कॉर्नर बैठकीमध्ये कानिफनाथ नागरे बोलत होते. यावेळी उमेदवार बदामराव पंडित माजी सभापती पंढरीनाथ लगड, भाऊसाहेब शिंदे, युवराज कोकरे, खदीर पटेल, सुनील कांडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना कानिफनाथ नागरे म्हणाले की, आजपर्यंत बीड जिल्ह्यात दोनच लोकनेते झाले एक गोपीनाथराव मुंडे आणि दुसरे बदामराव पंडित. गेवराई तालुक्याने बीडच्या पंडितांना पंधरा वर्ष तर गेवराईच्या पवार कुटुंबाला वीस वर्ष आमदारकी दिली होती. या काळात विकास कमी आणि गोरगरिबांची आडवणूकच जास्त झाली. बीडच्या पंडितांकडून साखर कारखाना, बाजार



समिती पंचायत समिती हे अडवणुकीचे केंद्र झाले तर दुसरीकडे जवळच्या मोरक्या कार्यकर्त्यांना गुत्तेदारी देण्यासाठीच आमदारकीचा वापर झाला. या दोन्ही कुटुंबांनी सामान्य लोकांना मात्र वाऱ्यावर सोडण्याचे चित्र संपूर्ण जिल्ह्याने पाहिले आहे. बदामराव पंडित हे मात्र तीन वेळेस आमदार आणि एक वेळेस मंत्री असूनही त्यांच्या डोक्यात कधी सत्तेची गुर्मी गेली नाही. त्यांची आमदारकी सामान्य लोकांच्या कामासाठीच कामी आली. आलेल्या प्रत्येक माणसाचं काम करणं हेच माझं कर्तव्य समजून बदामराव पंडितांनी काम केली. प्रशासकीय इमारती आणि गरिबांना वैयक्तिक लाभांची तसेच गाव पातळीवर विकासाची मोठी कामेही त्यांच्या काळात झाली. म्हणूनच आज गेवराई तालुक्यातील बदामराव पंडित यांची निवडणूक मतदारांनीच हाती घेतली आहे. बीडचे पंडित आणि गेवराईचे पवार यांच्याकडे काम घेऊन जायचं असेल तर कोणत्यातरी चमच्याला घेऊन जावे लागते मात्र बदामराव पंडित यांच्याकडे कोणत्याही व्यक्तीचं काम असलं तर ते काम करण्यासाठी आणि त्यांना भेटण्यासाठी मधल्या चमच्याची गरज पडत नाही, त्यामुळे बदामराव पंडित यांनाच प्रचंड मताधिक्याने विजयी करा असे आवाहन कानिफनाथ नागरे यांनी केले. याप्रसंगी प्रत्येक गावात झालेल्या कॉर्नर बैठकीला ग्रामस्थ आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बालाघाट अनिलदादांच्या पाठीशी ;माता-माऊल्यांनी औक्षण करून दिल्या विजयासाठी शुभेच्छा

## मगरूर क्षीरसागरांपासून बीड मुक्त करून मला विकास करायचाय- अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

तळागाळातील माणसांची जाण असणारे सर्वसामान्यांचे नेतृत्व मा. अनिलदादा जगताप यांच्या प्रचार दौऱ्यास मतदारांचा जोरदार प्रतिसाद मिळत असून ग्रामीण भागातील मतदार औंदा दादा तुम्हीच आमदार आशा प्रतिक्रिया व्यक्त करत विजयासाठी शुभेच्छा देत आहेत. विशेष म्हणजे गावागावतील माता-माऊल्यांनी औक्षण काढून दादा तुझ्या पाठीशी आम्ही आहोत, तू काळजीच करू नको म्हणून विजयासाठी आशीर्वाद देखील दिले.

काल दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी बालाघाटावरील चांदणी, तांदळवाडी घाट, साखरे बोरगाव,



उदंड वडगाव, चौदासवाडी, सफेपूर, रत्नागिरी, गवारी, मांजरसूंबा, सासेवाडी, खंडाळा, कोळवाडी या गावात निमित्त प्रचार गावाकऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या तर माजी मंत्री प्रा सुरेश नवले यांच्या उपस्थितीत कॉर्नर बैठका देखील घेतल्या. बालाघाटावरील गावागावात मतदारांनी अनिलदादा यांचे आगमन होताच जोरदार स्वागत करत हृदय सत्कार केला. आजवर आम्ही अनेकांना संधी दिली. मात्र प्रत्येकाने आमचा विश्वासघातच केला. आम्ही भूल थापांना बळी पडलोत. पण आता दादा तुम्ही सर्वसामान्यांचा आवाज आहात त्यामुळे औंदा आम्ही पूर्ण ताकदीने आमदार करणार असल्याची भावना बालाघाटावरील गावागावातून मतदारांनी व्यक्त केली. दरम्यान माजी राज्यमंत्री प्रा सुरेश नवले आणि अनिलदादा यांनी कॉर्नर बैठकीत मगरूर क्षीरसागरांपासून बीडवासियांची सुटका करून बीडचा विकास करायचा आहे आणि सामान्यांचे मूलभूत प्रश्न सोडवायचा आम्ही निर्धार केला असून आम्हाला मतदानरुपी आशीर्वाद द्या असे आवाहन केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप आणि प्रा नवले यांच्याबरोबर सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता तर गावागावात कॉर्नर बैठकीसाठी मतदारांची देखील भरीव उपस्थिती होती.

# करमाळा तालुक्यात आ.संजय मामा शिंदे यांना वाढता पाठिंबा



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा विधानसभा निवडणुकीसाठी चुरस वाढत चालली असून आमदार संजयमामा शिंदे यांना विविध गट, पक्ष, आणि संघटनांचा पाठिंबा मिळत आहे. ८ नोव्हेंबर रोजी आर.पी.आय.चे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष नागेश कांबळे यांनी आपल्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करून, आगामी निवडणुकीत दलित समाज संजयमामा शिंदे यांना संपूर्ण ताकदीनिशी पाठिंबा देणार असल्याचे जाहीर केले. त्यांनी सांगितले की, या निवडणुकीत दलित समाज किंगमेकरची भूमिका बजावणार आहे.

आज ९ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केमिस्ट्री भवन करमाळा येथे मेळावा घेत संजयमामा शिंदे यांना पाठिंबा जाहीर केला. यावेळी संजय बापू घोलप व मनसेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य गणेशभाऊ चिवटे यांनीही आपला पाठिंबा आधीच जाहीर केला आहे, आणि लवकरच मोठा मेळावा आयोजित करून हा पाठिंबा पुन्हा एकदा दृढ केला जाणार आहे.

राष्ट्रीय समाज पक्ष आणि वंचित बहुजन आघाडी हे देखील पाठिंबा देण्याच्या तयारीत असून, संजयमामा शिंदे यांच्या कॉर्नर सभांमध्ये जनतेचा उत्स्फूर्त सहभाग दिसत आहे. त्यांच्या वाढत्या पाठिंब्यामुळे विरोधकांसाठी ही निवडणूक डोकेदुखी ठरत आहे.

# राहुरीत शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचारार्थ पंकजा मुंडे यांच्या सभेला तुफान प्रतिसाद

**राहुरी । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप महायुतीचे सरकार येणार असल्याचा विश्वास भाजप नेत्या व आमदार पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार व माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचारासाठी आयोजित जाहीर सभेत त्यांनी हे वक्तव्य केले. कर्डिले हे आमच्यासाठी लकी आहेत, ते यंदा शंभर टक्के निवडून येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.



पंकजा मुंडे यांनी नरेंद्र मोदी सरकारच्या कामगिरीवर प्रकाश टाकला आणि महायुतीचे सरकार महाराष्ट्रात आणण्याचे आवाहन केले. नरेंद्र मोदींनी वैयक्तिक शौचालय, गॅस सिलेंडर, शेतकरी सन्मान योजना, आयुष्यमान भारत योजना यशस्वीपणे राबवल्या आहेत. नगर जिल्ह्यातील महायुतीच्या उमेदवारांना मतदान करा, कारण विरोधकांना चांगले सरकार चालवता येत नाही, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार मोनिकाताई राजळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगराध्यक्ष सत्यजित कदम, युवा नेते अक्षय कर्डिले, तसेच अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी उपस्थितांना संबोधित करताना, गोपीनाथ मुंडे यांनी २००९ मध्ये भाजपची उमेदवारी दिली व त्याद्वारे मला नागरिकांना विकास काय असतो हे दाखवून देता आले, असे सांगितले. त्यांनी महाविकास आघाडीच्या काळातील शेतकरी विरोधी धोरणांवर टीका करत, महायुती सरकारच्या शेतकरी हिताच्या योजना आणि मोफत वीज योजनेचे समर्थन केले.

यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे म्हणाले की, महायुतीचे उमेदवार निवडून येतील, यासाठी पालकमंत्री व विखे यांना सर्वांकडे लक्ष द्यायला हवे.

# प्रवक्ते पद गेलं तरी चालेल-नितेश कराळे मास्तरांचा घराणेशाहीवर टीका,पक्षावर संताप

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्ध्याचे नितेश कराळे मास्तर यांनी आपल्याच पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसवर घराणेशाहीचा गंभीर आरोप केला आहे. आर्वी आणि वर्धा मतदारसंघासाठी उमेदवारी मिळवण्यासाठी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडे मागणी केली होती. त्यासाठी त्यांनी इच्छुक उमेदवारीसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या होत्या. तथापि, ऐनवेळी वर्धा मतदारसंघ काँग्रेसला दिला गेला, तर आर्वी मतदारसंघ मयुरा अमर काळे यांना देण्यात आला. या निर्णयामुळे नाराज झालेल्या कराळे मास्तरांनी पक्षाच्या घराणेशाहीवर टीका केली आहे. कराळे मास्तर यांनी सांगितले की, पक्षाने एकाच घरात खासदार आणि आमदार दोन्ही उमेदवारी कशा दिल्या? सामान्य कार्यकर्त्यांना महत्त्व दिलं पाहिजे, त्यांच्या मतांना जागा मिळालं पाहिजे. त्यांनी घराणेशाहीवर टीका करत असं स्पष्ट केलं की, जो कुठला पण पक्ष घराणेशाही करेल,



त्याला माझा विरोध असेलच.

नितेश कराळे मास्तरांनी एका पत्रकार परिषदेत आपला संताप व्यक्त केला. त्यांनी सांगितलं की, आर्वी मतदारसंघावर माझा दावा होता, मात्र खासदार अमर काळे यांच्या पत्नीसाठी मतदारसंघ राखण्यात आला. यामुळे लोकांमध्ये नाराजी आहे. मी यावर शरद पवारांशी बोलणार आहे.

त्यांनी पक्षातील निर्णयांवर नाराजी व्यक्त करत, आता मी भाषणं देण्यासाठी शुल्क घेईन. महाविकास आघाडीच्या नेत्यांना याबाबत मी स्पष्ट सांगितले आहे, अशी प्रतिक्रिया दिली.

नितेश कराळे मास्तरांचा हा घोष निश्चितच पक्षात खळबळ माजवणारा ठरला आहे. घराणेशाहीविरोधात आपला आवाज उठवणारे कराळे मास्तर आगामी काळात या मुद्द्यावर आणखी सक्रिय होण्याची शक्यता आहे.

# ब्राह्मण समाजातील प्रत्येक घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार-आशिष दामले

**केज । सचिन भालेराव**

परशुराम आर्थिक विकास महामंडळ अध्यक्ष पदी कॅप्टन आशिष दामले यांची नियुक्ती झाल्या बद्दल समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती च्या वतीने आयोजित सत्कार प्रसंगी बोलताना आशिष दामले म्हणाले की संघर्ष समितीने संघर्ष केल्यामुळे परशुराम आर्थिक विकास महामंडळ निर्माण झाले व मला पहिले अध्यक्ष पद मिळाले असल्यामुळे मी राज्यातील गरजू ब्रहनाना मदत करण्याचे काम मी करेल अशी ग्वाही दिली समाधान महाराज शर्मा यांच्या हस्ते आशिष दामले यांचा सत्कार करण्यात आला.




मागील अनेक वर्षांपासून समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती समाजातील गरजू घटका साठी काम करत असताना सरकार कडून परशुराम आर्थिक विकास महामंडळ ही मागणी भावनिकतेने जोडली होती. याचा पाठपुरावा करण्यासाठी धरणे मोर्चा आमरण उपोषण करत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या सोबत बैठक घेऊन आर्थिक विकास महामंडळ जाहीर झाले व पहिले अध्यक्ष पदी कॅप्टन आशिष दामले यांची नियुक्ती झाली. रविवार दि १० नोव्हेंबर रोजी केज येथे सत्कार आयोजित केला असताना संघर्ष समितीच्या सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी मंचावर भागवत कथाकर ह भ प समाधान महाराज शर्मा व दिपक देशपांडे हे होते यावेळी महाराष्ट्र भरातील सदस्य उपस्थित होते त्यांचा सत्कार करण्यात आला अशोक वाघ जळगाव , अर्चना सरूडकर बदलापूर, ऍड प्रज्ञा भिडे मुंबई , विजया अवस्थी सम्भाजीनगर , डॉ राजेंद्र चौधरी पाथरी, प्रवीण जोशी पाथरी , मकरंद सोनेसांग्विकर अंबाजोगाई , डॉ महेश अकोलकर अंबाजोगाई, दिगंबर जोशी वडवणी , योगेश जोशी चिंचाळा , आनंद कुलकर्णी माजलगाव , भीमाशंकर कुलकर्णी औसा व केज येथील श्रीनिवास केजकर , अनंत कोकीळ , चंद्रकांत पाटील , शिवराज मुथळे , समीर देशपांडे , दिपक देशपांडे, प्रशांत देशपांडे, श्रीधर खोत , आनंद कुलकर्णी शिरूर घाट आदी चा सत्कार करण्यात आला यांप्रसंगी बोलताना आशिष दामले म्हणाले कीं समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीने केलेली विविध आंदोलने यामुळे परशुराम आर्थिक विकास महामंडळ समाजाला मिळाले व मला अध्यक्ष पद मिळाले या पुढे मी समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचा व सर्वांना सक्षम करण्याचा प्रयत्न करणार असून कधीही कसलीही गरज पडली तर सांगा आपण पर्याय काढू व समाजाला सक्षम करू असे आश्वासन दिले. यावेळी ह भ प समाधान महाराज शर्मा यांनी त्याना शुभेच्छा दिल्या कार्यक्रम संचालन धनंजय कुलकर्णी यांनी केले.

यावेळी सौ धनश्री कुलकर्णी , सौ स्वाती कोकीळ, सौ ज्योती पाटील, सौ अमृता कुलकर्णी , ऋषिकेश कुलकर्णी, सतीश केजकर , अभय जोशी , डॉ राघवेंद्र कुलकर्णी आदी उपस्थित होते

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077